# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सभा दिनांक २८/१२/२०२२

---

## कार्यवृत्त

आज दिनांक २८/१२/२०२२ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या बांधकाम विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

**विषय क्र.१** :- प्रभाग क्र ३ लक्ष्मीनगर भागातील करावयाच्या विकास कामांना मान्यता देणेबाबत.

**विषय क्र.२** :- न.प. हद्दीतील विविध प्रभागात करावयाच्या विकास कामांबाबत

---

**विषय क्र.१ :- प्रभाग क्र ३ लक्ष्मीनगर भागातील करावयाच्या विकास कामांना मान्यता देणेबाबत.**

वरील विषयाची नगर अभियंता बांधकाम विभाग यांच्या विषयावरील मुख्याधिकारी न.प. मलकापूर यांच्या टिप्पणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले. त्यावर विर्स्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, प्रभाग क्र ३ लक्ष्मीनगर भागात रहिवाश्यांच्या सोईच्या दृष्टीने त्या भागातील नागरिकांच्या तोंडी तक्रारी नुसार नागरी सुविधा योजना / नगरोत्थान योजना / दालीतेत्तर योजना वा इतर योजना निधी अंतर्गत विकास कामे केल्यास त्या भागातील रहिवाश्यांना त्याचा लाभ घेता येईल व त्यांना होणारा त्रास दूर होईल. त्यानुसार करावयाची विकास कामे खालील प्रमाणे.

१) मलकापूर न.प. हद्दीतील प्र क्र ३ लक्ष्मीनगर मध्ये गुप्ताजी यांचे घरापासून ते वानखेडे यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे

२) मलकापूर न.प. हद्दीतील प्र क्र ३ लक्ष्मीनगर मध्ये लक्ष्मण तायडे यांचे घरापासून ते ओम तळेकर यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.

३) मलकापूर न.प. हद्दीतील प्र क्र ३ लक्ष्मीनगर मध्ये शुभम डोसे यांचे घरापासून ते भोयटे यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.

४) मलकापूर न.प. हद्दीतील प्र क्र ३ लक्ष्मीनगर मध्ये शांताराम काळे यांचे घरापासून ते मुख्य रस्त्यापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे.



Scanned by Scanner Go

तरी सदरची कामे नागरिकांच्या सोयी व सुविधांच्या दृष्टीने करणे गरजेचे असल्याचे नगर अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालात नमूद केलेले आहे. त्यानुसार मुख्याधिकारी यांनी सदर बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली.

वरील सर्वबाबींचा विचार करता, उपरोक्त कामे नागरी सुविधा योजना / नगरोत्थान योजना / दालीतेत्तर योजना वा इतर योजना निधीतून करण्यास ही सभा मान्यता देत आहे

**विषय क्र.२ :- न.प. हद्दीतील विविध प्रभागात करावयाच्या विकास कामांबाबत**

न.प.हद्दीतील विविध प्रभागात करावयाच्या विकास कामे करण्याबाबतच्या कामाची मा.मुख्याधिकारी नगर परिषद मलकापूर यांचे कार्यालयीन टिपणीचे वाचन सभेसमोर करण्यात आले.त्यावर विस्तृत चर्चा करण्यात आली.

ठरविण्यात येते की, मा. आमदार श्री. राजेशजी एकडे मलकापूर विधानसभा मतदार संघ यांनी नगर परिषद हद्दीतील विविध प्रभागात सोबतच्या यादीतील कामे त्या भागातील नागरीकांच्या दृष्टीने करणे अत्यंत जरुरीचे असल्याने नगरोत्थान योजना / नागरी सुविधा योजना / दलितेत्तर योजना व इतर योजनेतून कामे घेण्याबाबत सुचविले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| 1 | संजय पाटील यांचे घरापासून ते डॉ.विपूल पाटील यांचे घरापर्यत व विशाल दवे यांचे घरापासून ते बंटी पाटील यांचे घरापर्यत एका बाजूने नाली बांधकाम करणे. |
| 2 | i) शे.समशेर ऑटोवाले यांचे घरामागील दोन गल्ल्यामध्ये रस्ता कॉंक्रीटीकरण<br>ii) समशेर ऑटोवाले यांचे घरापसून ते शे.महेबूब यांचे घरापर्यत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| 3 | बद्री कॉम्पलेक्स परिसरामध्ये नारखेडे यांचे घरापासून ते मारवाडी ढाबा यांचे मागील रस्ता कॉंक्रीटीकरण व नाली बांधकाम करणे. |
| 4 | नसवाला चौक ते किल्ला चौक पर्यत रस्ता कॉंक्रीटीकरण व नाली बांधकाम करणे. |
| 5 | द्वारकानगरमध्ये हेमंत शर्मा यांचे घरापासून ते बोंडे काका यांचे घरापर्यत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| 6 | डॉ.मनोज पाटील ते कोलते हॉस्पिटलपर्यत रस्ता डांबरीकरण करणे व दोन्ही बाजूने नाली बांधकाम करणे. |
| 7 | प्रभाग क्र.9 मध्ये काशीपूरा मोरी पासून ते ढोले यांचे घरापर्यत रस्ता सिमेंट कॉक्रीटीकरण करणे. |
| 8 | प्रभाग क्र.14 मध्ये ज्ञानेश्वर नगर मध्ये प्रल्हाद सातव यांचे घरापासून गणबास यांचे घरापर्यत सिमेंट कॉंक्रीट रस्ता व दोन्ही बाजूने नाली बांधकाम करणे. |
| 9 | उपजिल्हा रुग्णालय मलकापूर समोरील रस्ता डांबरीकरण करणे. |



Scanned by Scanner Go

| | |
|---|---|
| 10 | मदनलाल संचेती शाळेपासून ते गुरुद्वारापर्यंत रस्ता डांबरीकरण व एका बाजूने नाली बांधकाम करणे. |
| 11 | निळे कॉम्प्लेक्स पासून ते गजानन बावस्कर यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण व एका बाजूने नाली बांधकाम करणे. |
| 12 | अरबी मदरसा पासून ते चुना कब्रस्थानपर्यंत व सलीम बम्बय्या यांचे घरापासून ते अहमद खान यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण व एका बाजूने नाली बांधकाम करणे व हिदायत जमादार यांचे घरापासून ते असगर सर यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| 13 | प्र.क्र.2मध्ये छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते येडेश्वरी माता मंदीपर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण व एका बाजूने सिमेंट कॉंक्रीट नाली बांधकाम करणे. |
| 14 | शिवाजी नगर प्रभाग क्र.2 मधील शिवाजी नगर वार्डात अंतर्गत सिमेंट कॉक्रीट गटार बांधणे छत्रपती शिवाजी महारात पुतळा ते हनुमान मंदीरापर्यंत. |
| 15 | अफसर मेमन किराणा पासून ते अन्वरखान यांचे घरापर्यंत नाली बांधकाम व कॉंक्रीटीकरण करणे. |
| | एकूण |

वरील प्रस्तावित केलेली कामे ही सन 2022-2023 या आर्थिक वर्षात प्राप्त होणाऱ्या नगरोत्थान योजना / नागरी सुविधा योजना / दलितेत्तर योजना वा इतर योजने अंतर्गत कामे करण्याबाबत नगर अभियंता बांधकाम विभाग नगर परिषद मलकापूर यांनी अहवाल सभेसमोर सादर केला आहे.

वरील सर्वबाबीचा विचार करता नगर अभियंता बांधकाम विभाग न.प.मलकापूर याचे उपरोक्त अहवालानुसार काम क्र. 1 ते 15 सन 2022-2023 अंतर्गत नगरोत्थान योजना / नागरी सुविधा योजना / दलितेत्तर वा इतर योजने अंतर्गत करण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**आर यु सुरडकर**
**प्रशासक**
**नगरपरिषद मलकापूर**



Scanned by Scanner Go